| |
|---|
| **रिझर्व्ह बँक - इंटिग्रेटेड ऑम्बुड्झमन स्कीम, 2021:** |
| **<u>ठळक वैशिष्ट्ये</u>** |
| **या योजनेमध्ये पुढील विनियमित संस्थांचे ग्राहक येतात: -** |
| • कोणतीही बँक |
| • कोणत्याही एनबीएफसीज, कोअर इन्व्हेस्टमेन्ट कंपनीच्या (सीआयसी) व्यतिरिक्त, इन्फ्रास्ट्रक्चर डेब्ट फंड-नॉन बँकिंग फायनान्शियल कंपनी (आयडीएफ-एनबीएफसी), नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी-इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी (एनबीएफसी-आयएफसी), ठरावामधील किंवा समापनामधील/लिक्विडेशनमधील कंपनी, रिझर्व्ह बँकेद्वारे नमूद इतर कोणतीही एनबीएफसी. |
| • पेमेन्ट व सेटलमेन्ट सिस्टम्स ॲक्ट, 2007 अंतर्गत निश्चित करण्यात आलेला कोणताही सिस्टम सहभागी. |
| **ग्राहकाने तक्रार दाखल करण्यासाठीची कारणे:** |
| ज्याची परिणती सेवेच्या कमतरतेमध्ये होते अशी उपरोल्लिखित विनियमित संस्थांची कोणतीही कृती किंवा अकृती. |
| **तक्रार न राखण्यासाठीची कारणे:** |
| सेवेमधील कमतरतेसाठी कोणतीही तक्रार नसणे हे पुढीलचा समावेश असणाऱ्या प्रकरणांमधील योजनेच्या अंतर्गत येते: |
| • विनियमित संस्थेचा व्यापारी न्यायनिर्णय/व्यापारी निर्णय |
| • कंत्राट आउटसोर्स करण्यासंबंधात व्हेन्डर व विनियमित संस्था यांच्यामधील विवाद |
| • थेटपणे लोकायुक्तांना संबोधित न केलेली व्यथा |
| • विनियमित संस्थेचे व्यवस्थापन किंवा एक्झिक्युटिव्हज यांच्याविरोधातील सर्वसाधारण व्यथा |

| |
|---|
| • असा विवाद ज्यामध्ये सांविधिक किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाच्या आदेशाचे अनुपालन करताना विनियमित संस्थेद्वारे कृती केली जाणे |
| • रिझर्व्ह बँकेच्या कक्षेत न येणारी सेवा |
| • विनियमित संस्थांमधील विवाद; आणि |
| • विनियमित संस्थेच्या इम्प्लॉयी-इम्प्लॉयरचा संबंध समाविष्ट असणारा विवाद |
| **ग्राहक कशा प्रकारे तक्रार दाखल करू शकतो?** |
| संबंधित एनबीएफसीला लिखित निवेदन करता येऊ शकेल |
| **एका महिन्याच्या अखेरीस** |
| एनबीएफसीकडून उत्तर प्राप्त न झाल्यास किंवा एनबीएफसीच्या उत्तराने ग्राहकाचे समाधान न झाल्यास. |
| **ग्राहक कोणत्याही मंचाकडे गेलेला नसल्यास** |
| एनबीएफसी लोकायुक्तांकडे तक्रार दाखल करा (एनबीएफसीकडून उत्तर आल्यानंतर एका वर्षापेक्षा अधिक कालावधीनंतर नाही) |
| **लोकायुक्त कशा प्रकारे निर्णय घेऊ शकतात?** |
| • लोकायुक्तांसमक्षचे कामकाज हे संक्षिप्त स्वरुपात देण्यात येत आहे. |
| • समेटाद्वारे समझोत्याला चालना देतात. समझोता न झाल्यास, ते निवाडा/आदेश जारी करू शकतात. |
| **लोकायुक्तांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, ग्राहक अपील करू शकतो का?** |
| होय, लोकायुक्तांचा निर्णय अपील करण्यायोग्य असल्यास. अपील प्राधिकरण: योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या विभागाचे प्रभारी कार्यकारी संचालक |
| **टीप:** |

| | |
|---|---|
| • | ही एक पर्यायी तक्रार निवारण यंत्रणा आहे. |
| • | ग्राहकाला कोणत्याही प्रकारच्या निवारणासाठी इतर कोणत्याही न्यायालयामध्ये/मंचावर/प्राधिकरणाकडे जाण्याचे स्वातंत्र्य आहे. |
| • | योजनेच्या अधिक तपशीलासाठी *www.rbi.org.in* चा संदर्भ घ्या. |